महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

# महापारेषण समाचार

वर्ष-११ अंक-१

डिसेंबर - जानेवारी २०१७

प्रिय कर्मचारी बंधु आणि भगीनींनो,

२०१६-२०१७ च्या शेवटच्या तिमाहीत अधिक क्षमतेने आपण ह्या वर्षाकरीता ठरवलेल्या लक्षांना प्राप्त करण्याच्या प्रयत्नात असणार ह्याबद्दल मला खात्री आहे. ह्या चालु वित्तीय वर्षाकरीता प्रत्येक विभागाकरीता ठरवुन दिलेली लक्षे गाठण्यात आपल्याला यश येईल ह्याबद्दल मी आशा बाळगतो. अनेक धोरणात्मक निर्णय घेऊन प्रत्येक विभागामध्ये कार्यकुशलता आणण्याचा जाणीवपुर्वक प्रयत्न वर्ष २०१६ मध्ये आपण केला. सर्व विभागीय अधिकारी व कर्मचारी यांनी ह्या कार्यात फार चांगले योगदान देऊन सहकार्य केले.

आजच्या बदलत्या युगात आपली कार्यक्षमता वाढवून कामाचा वेग व गुणवत्ता वाढविणे ही स्पर्धात्मक युगात आपला आघाडीचा स्तर कायम ठेवण्याची गुरुकिल्ली आहे. विजक्षेत्रात महाराष्ट्र राज्य प्रगती करत आहे. अनेक अभिनव प्रकल्प महाराष्ट्र राज्य विजक्षेत्रात यशस्वीरीत्या राबवित आहे. Diagnostic Testing and Measuring Equipments, HLM तसेच अनेक Technology Driven तंत्रज्ञान वापरुन संचलन व सुव्यवस्था भक्कम करण्याचे प्रयत्न केले. त्याचबरोबर Inventory Management, प्रकल्प नियोजन, Line Extension Schemes, RoW, Land Acquisition, Projects Completion अश्या अनेक बाबींवर प्रदीर्घ विश्लेषन करुन त्यामधील समस्यांचे निराकरण करण्याचे प्रयत्न करण्यात आले व त्याचे चांगले परिणाम येत असतांना आपण पाहत आहोत. SCADA/Sub Station Automation ह्या अतिशय महत्वाच्या विषयावर ह्या क्षेत्रातील तज्ञांकडून जसे GE, SIMENS, ABB उहापोह करुन आपल्या प्रणालीतील त्रुटी/फळी शोधुन त्यावर कृती आराखडा तयार करण्याचे काम प्राध्यान्यक्रमाने घेण्यात येत आहे. Automation System च्या Integration चे चांगले परिणाम ह्यामुळे भविष्यात आपल्याला मिळतील ह्याची मला खात्री आहे. आपले अभियंते प्रकल्प तसेच संचलन/सुव्यवस्थेमध्ये निपुण होण्याकरीता प्रथमत: प्रकल्प विभागाकरीता संचालक (प्रकल्प) यांच्या अध्यक्षतेखाली प्रकल्प अभियंताकरीता दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात येत आहे. तद्नंतर संचलन व सुव्यवस्था व तपासणी अभियंताकरीता अश्या प्रकारच्या कार्यशाळेचे आयोजन संचालक (संचलन) यांच्या अध्यक्षतेखाली वर्ष २०१७-२०१८ करणे नियोजित आहे. अश्या प्रकारच्या प्रशिक्षण कार्यक्रमामुळे वरिष्ठ व्यवस्थापनाकडे आपले विचार मांडण्याची संधी तरुण अभियंत्यांना मिळते तसेच वरिष्ठ व्यवस्थापनास आपले ध्येय, उद्दीष्ट व Vision सर्वासमोर मांडता येते. त्यामुळे फार चांगल्याप्रकारे आपल्या अभियंत्यांना कंपनीच्या ठरवून दिलेल्या लक्षांशी एकरुप करण्यात येते.

आपण आपल्या आस्थापनात अपघात होताना तसेच दुर्घटना घडताना पाहतो. त्यांचे विश्लेषण केले असता मला असे समजते की, हे प्रकार टाळता येऊ शकले असते. आपल्याकडुन कोणत्याही त्रुटी राहणार नाहीत ह्याची दक्षता घेणे हा आपला संचलन व सुव्यवस्थेमधला कामाचा मोठा भाग आहे. Zero Accident व Zero Defect ह्या सिध्दांतावर आपली कार्यप्रणाली आधारलेली असणे गरजेचे आहे. Sub Station मध्ये आगी लागणे तसेच छोटी/मोठी दुर्घटना होणे ह्या गोष्टी अस्विकार्य आहेत. त्यामुळे फक्त पारेषण प्रणाली अडचणीत न येता फार मोठया प्रमाणात कंपनीचा वेळ, पारेषण प्रणाली आटोक्यात आणुन त्या पुर्न:स्तावर आणण्यात जातो. सततचा (वेळापत्रकानुसार) नियोजनबध्द आढावा घेतल्याने कामाची शिस्त लागते. त्यामुळे संचलन व सुव्यवस्था अबाधीत राखण्यास फार मोलाचा हातभार लागतो. तसेच आपला परिसर स्वच्छ/टापटीप ठेवणे हा सुध्दा कामाचा एक भाग आहे. Housekeeping चे Five "S" चे Techniques अभ्यास करुन आपल्या कार्यक्षेत्रात त्याचा आपण वापर कराल असे मी आपल्याला आवाहन करतो. आपले कार्यक्षेत्र Full Proof व Model कार्यक्षेत्र होण्याकरीता Sub Station प्रमुख म्हणून आपल्या Role and Responsibilities चा पुरेपुर वापर करुन चांगले काम करावे हे आपल्याकडुन अपेक्षित आहे. आपले Efforts कुठे कमी पडले नाही पाहिजे. अनेक नाविन्यपुर्ण कामे करण्याचा ध्यास आपण सर्वांनी घेतला तर त्याचा फायदा कंपनीच्या प्रगतीकरता होऊ शकतो.

कंपनीची प्रगती करणे फक्त व्यवस्थापनाची जबाबदारी नसुन प्रत्येक अधिकारी/ अभियंता/ कर्मचारी त्यातला एक महत्वाचा घटक आहे. माझी कंपनी अशी जाणीव आपल्याला होणे गरजेचे आहे. त्यामुळे आपण फक्त सरकारी नोकर नाही व माझे काम फक्त सेवा देणे नाही तर त्याचे संगोपन करणे हे सुध्दा आहे. त्याची जाणीव आपल्याला तेव्हा येईल जेव्हा आपण पुढच्या पातळीवर जावून विचार करु की ही माझी कंपनी आहे. STU, SLDC, F&A, HR तसेच ERP ह्या विभागांचा सुध्दा सततचा आढावा घेऊन त्यांच्या कार्यक्षमतेच्या वाढीस अनेक योजना तयार करुन त्याची अंमलबजावणी सुरु आहे. त्याचे चांगले परिणाम आपल्याला मिळतील ह्याचा मला विश्वास आहे. महापारेषण कंपनीला देशातील एक अग्रसर पारेषण कंपनी म्हणून नावलौकिक मिळविण्याचा संकल्प वास्तविकतेमध्ये आणण्याकरीता आपण सर्व योगदान देत आहोत व पुढेही ते देत राहाल अशी मला खात्री आहे. तत्परता, वेग, गुणवत्ता व खर्चाचे नियंत्रण ह्या गोष्टी कंपनीच्या यशाचे गमक आहेत. माझी एकच इच्छा आहे की समाधानी होऊन स्वस्थ बसु नका तर सतत आपल्याशी चुरस करा. पहा आपण आणखी काम करु शकतो. कुठे Gaps आहेत का ? कामामध्ये आणखी Improvements करता येतील. Optimum Level ला माझे Resources चे Utilisation होत आहे का? 'Perfection is not a destination, it is a Journey" त्याकरीता प्रत्येक अधिकारी/ अभियंत्यांच्या Success Stories बनल्या पाहिजेत व त्या समजून घेण्याकरीता मी उत्सुक आहे. अश्या अनेक Success Stories घडल्या तर आपली कंपनी Success Story होईल, ही यशाची गुरुकिल्ली आहे.



**राजीव कुमार मित्तल**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

**शुभेच्छा सह !!!**

**राजीव कुमार मित्तल**
अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

# From the Desk of Director (Projects)
# Importance of Quality for success of Transmission projects

A construction project in its life span goes through different phases. The main phases of a project can be described as: conceptual planning, feasibility study, design, procurement, construction, acceptance, operation and maintenance. Quality is one of the critical factors in the success of construction projects, which is linked with proper quality management in all phases of project life cycle. Design & construction are the two important phases of project life cycle which affects quality outcome significantly.

Quality is forgotten aspect in Project Management. From research papers, it is observed that, about 6-15% of construction cost is found to be wasted due to rework of defective components detected late during construction and 5% of construction cost is wasted due to rework of defective components detected during maintenance. Hence, quality has become one of the most important competitive strategic tools.

The concept of quality management is to ensure efforts to achieve the required level of quality for the project which are well planned & organized. For MSETCL, quality can be defined as meeting the regulatory requirements/standards and MSETCLs specifications.

The concepts such as quality planning (identification of quality standards), quality assurance (evaluation of overall project performance) and quality control (monitoring of specific project results) are important in the quality management processes. Quality Assurance (QA) is a program covering activities necessary to provide quality in the work to meet the project requirements. The Quality Control (QC) is the specific implementation of the QA program and related activities since inception. The quality control, based on tender documents, specifications, working drawings etc, reduces the possibility of changes, mistakes and omissions, which in turn result in overall cost savings.

Project leadership is most crucial, because, the poor management practices directly and indirectly lead to decline of construction productivity and ultimately effect on project quality. The quality drawings, standards, constructability of design, commitment, training & awareness and the team working of all parties involved in the process may lead to enhance construction project quality.

Poor quality could lead to unnecessary cost to the organization where it could create costs due to prevention, appraisal and failure. Prevention is anything that we do to keep errors from happening in the first place. The prevention cost include the costs related to all activities of preventing defects from occurring and to keep appraisal and failure to a minimum, such as, new technology review, quality planning, supplier surveys, process reviews, quality improvement teams, education and training. Appraisal cost results from the inspection of a finished part to be sure that no errors have been made. Appraisal cost could incur while performing measuring, evaluating or auditing to assure the quality conformance which include first time inspection, checking, testing etc. Further, failure cost could be occurred as internal and external failures which includes rework, crap, re- inspection, re-testing, redesign, material review, repair costs.

According to Indian Electricity act 2003, it is our duty to build, maintain and operate an efficient, coordinated and economical inter-State transmission system to maintain continuous supply to the consumers. These duties can only be achieved through good quality practices during the planning, construction as well as operation of project. The MERC approves the Annual Revenue Requirement (ARR) of the MSETCL on the basis of specified expenditure norms for circuit kilometer of transmission lines and number of bays in the commissioned substation, Asset capitalized, interest on short-term/ long term loans etc. If the costs increases due to quality effects, it will automatically adversely affect the financial condition of MSETCL. In other word, no control on expenditure will result in to erosion of Return on Equity. Which in turn affect our capital expenditure for infrastructure development. The inferior quality also increases the R&M expenditure and it is indirectly loaded on the consumer which is not good from social point of view. Also, increase in electricity tariff badly affects the development of industries which in turn affects employment generation.

Directing a construction project towards quality with low cost and time is a greater concern today. It is because quality is required to meet project requirements of the stakeholders. Moreover, poor quality could lead to unnecessary cost to the organization where it could create costs due to failure, appraisal and prevention. Implementing proper quality management plan is important since the project inception where, quality drawings/standards and design may lead to enhance the project quality. Hence, it is utmost important to adhere to quality standards from project inception to completion & commissioning stages.

**Ravindra Chavan**

**Director (Projects)**

## प्रकल्प अभियंताच्या सक्षमीकरणाकरिता दोन दिवसीय परिषदेचे सांघिक कार्यालय प्रकल्प विभागातर्फे आयोजन




दि. ५.१.१७ ते ७.१.१७ रोजी हॉटेल रिधम लोणावळा येथे प्रकल्प अभियंत्यांचे दोन दिवसांचे शिखर परिषद संपन्न झाले. या परिषदेत, श्री. रविंद्र चव्हाण, संचालक (प्रकल्प), श्री. विनायक साठे, संचालक (वित्त), श्री. सुरज वाघमारे, कार्यकारी संचालक (मासं), मुख्य अभियंते, श्री. राजेद्र गायकवाड, श्री. श्रीराम भोपळे व श्री रोहिदास मस्के, श्री. सुगत गमरे, मुख्य महाव्यवस्थापक (मासं), श्री. एस. जे. आंबेरकर, मुख्य महाव्यवस्थापक (वित्त व लेखा), कु. विनिता श्रीवानी, कंपनी सचिव व श्री. सुधीर वानखेडे, महाव्यवस्थापक (मासं) उपस्थित होते. प्रकल्प अभियंत्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी या परिषदेने आयोजन करण्यात आले होते. श्री. रविंद्र चव्हाण, संचालक (प्रकल्प) यांनी उपस्थित अभियंत्यांना मार्गदर्शन केले. प्रकल्प विषयक तांत्रिक ज्ञान व व्यवस्थापकीय कौशल्य वृद्धिगत करण्यासाठी विविध विषयांवर सखोल चर्चासत्रे झाली. या कार्यक्रमाकरिता पुणे व नाशिक परिमंडलामधुन आलेल्या १०५, अभियंत्यांनी भाग घेतला.






## SCADA / Substation Automation वर कार्यशाळेचे आयोजन







दि. २१.०१.२०१७ रोजी मुंबई येथे SCADA/ Substation Automation - प्रणालीवर कार्यशाळा आयोजीत करण्यात आली त्यामध्ये महापारेषणचे वरिष्ठ अधिकारी व जनरल इलेक्ट्रीकचे अधिकारी उपस्थित होते. या कार्यशाळेमध्ये मा. राजीवकुमार मित्तल अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, श्री. ओमप्रकाश एम्पाल, संचालक (संचलन), श्री. रविंद्र चव्हाण, संचालक (प्रकल्प), श्री. शंशाक जोगळीकर, मुख्य अभियंता, श्री. श्रीराम भोपळे, मुख्य अभियंता तसेच इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते. जनरल इलेक्ट्रीक कंपनी तर्फे श्री. राजेंद्र कुटे, श्री. रितेश भारत, श्री. प्रशांत गोपाल, श्री. बाळासाहेब थेटा, श्री. दुर्गेश ढापरे व श्री. प्रविण तळेकर उपस्थित होते. कार्यशाळेचे प्रस्ताविक श्री. सुगत गमरे, मुख्य महाव्यवस्थापक (मासं) यांनी केले. या विषयावर आधारित फिल्ड विझीट, २२० की.ओ. कोडंवा (पुणे), उपकेंद्र येथे दि. २३.१.२०१७ रोजी आयोजीत करण्यात आली.

## Sub/Station Automation Technology Workshop at Corporate Office , Mumbai.

दि २१.०१.२०१७ च्या M/s GE सोबतच्या एकदिवसीय SCADA/Substation Automation Workshop नंतर दि ३०.०१.२०१७ रोजी M/S Simens सोबत कार्यशाळेचे आयोजन मुख्य कार्यालयात करण्यात आले होते.

हया Series च्या दुसऱ्या चर्चासत्रात Automation विषयाबाबत प्रदीर्घ चर्चा करण्यात आली. त्याच बरोबर Field Visit सुध्दा आयोजन करण्यात आले.

महापारेषण कंपनीतर्फे CMD, Directors तसेच हया विषयासंदर्भातील CE, SE, आणि EE हया कार्यक्रमास उपस्थित होते.

हया चर्चासत्राच्या पश्चात Automation विषयावर कृती आराखडा तयार करुन नियमित कालखंडात कालबाहय स्वरुपात कार्यवाही करण्यात येईल. ह्या कार्यक्रमानंतर M/s Sifang, M/s. Schneider तसेच M/s. ABB बरोबर सुध्या कार्यक्रमाचे दि. ०६.०२.२०१७, १३.०२.२०१७ व २०.०२.२०१७ अनुक्रमे आयोजन करण्यात येणार आहे.

## GETCO कंपनीचे अ व व्य सं. श्री. सुरेंद्र कुमार नेगी, यांची महापारेषण कंपनीस भेट



महापारेषण कंपनीची ERP प्रणाली बद्दल माहीती मिळवुन घेण्याच्या उद्देशाने श्री. सुरेंद्र कुमार नेगी CMD GETCO यांनी महापारेषण कंपनीला दि. १७.०१.२०१७ रोजी भेट दिली. भेटीचे आयोजन कंपनीचे अध्यक्ष व व्यस्थापकीय संचालक यांच्या निर्देशानुसार शिष्टाचार अधिकारी यांनी केले. श्री. नेगी यांचे स्वागत ED, HR, CE Vashi व CGM (HR) यांच्या उपस्थितीत Director (O) यांनी केले. ERP Team ने संपुर्ण ERP बद्दलची माहिती ERP प्रमुख, CE (Trans), श्री. एस. टी. शिंदे यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी श्री. नेगी यांना दिली. श्री. नेगी यांनी महापारेषण कार्याचे कौतुक करुन पुढील वाटचाली बद्दल शुभेच्छा दिल्या.

## प्रजासत्ताक दिन महापारेषण कंपनीत मोठया उत्साहात साजरा



प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात दि.२६.०१.२०१७रोजी महापारेषण कंपनीच्या विविध कायीलयता साजरा करण्यात आला सांधीक कार्यालयात मा.अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या हस्ते ध्वजारोहण होऊन ध्वजास मानवंदना देण्यात आली.मुख्य कार्यालयातील अधिकारी/ कर्मचारी हया कार्यक्रमास उपस्थीत होते. महाराष्ट्र शासनाच्या वतीने साजरा होणाऱ्या ध्वजाराहोनाच्या शिवाजी पार्क येथील कार्यक्रमात महापारेषण कंपनीने चित्ररथ सादर केला होता तिनही कंपनीचे




प्रतिनिधीत्व करण्याची संधी उर्जा विभागतर्फे महापारेषण कंपनीस मिळाली त्यानुसार तिनही कंपनीशी समन्वय साधुन महापारेषण कंपनीचा चित्ररथ **<u>"Clean Energy, Green Energy"</u>** ह्या संकल्पनेवर आधारीत तयार करण्यात आला होता आपल्या कार्याचे जनसमुदनास आकलन होण्याच्या उद्देशाने हया चित्ररथात वाशी परिमंडळातील Line Maintenance विभागाची तुकड़ी श्री महाले यांच्या नेतृत्वाखाली मुख्य अभियंता, वाशी श्री. एस.टी. शिंदे यांनी उपलब्ध करुन दिली. त्यामुळे महापारेषण चे कार्य लोकांना समजण्यास मदत झाली महापरेषणच्या चित्ररथ दखल हया प्रसंगी अनेक नामंकीतांनी घेतली भारत देशाचा प्रजासत्ताक दिन चिरायु होवो !



## नेताजी सुभाषचंद्रबोस यांची जयंती कार्यक्रम



अउदा प्रकल्प नि. संवसु परिमंडळ, नागपुर येथील कार्यलयामध्ये दि. २३.०१.२०१७ रोजी "नेताजी सुभाषचंद्र बोस" यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

मुख्य अभियंता, श्री. एम.एन. बहादुरे यांनी 'नेताजी सुभाषचंद्र बोस" यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला यावेळी परिमंडळ कार्यालयातील सर्व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

तसेच दि. २३.०१.२०१७ रोजी परिमंडळ कार्यालयात असलेल्या आंतरपरिमंडळीय नाट्य स्पर्धा २०१६-१७ करिताच्या बैठकानिमित्त आलेले श्री. अनंत पाटील, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांची विशेष उपस्थित होती तससेच बैठकी करिता इतर परिमंडळातून आलेल्या अधिकाऱ्यांची सुद्धा सदर कार्यक्रमास उपस्थिती होती.

## क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी



दि ०३.०१.२०१६ रोजी महापारेषण कंपनीत मुख्य कार्यालयात येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. श्री. आर.डी. चव्हान, संचालक (प्रकल्प) यांनी अध्यक्षीय भाषणातून सावित्रीबाईच्या संघर्षमय जीवनाचे पैलु, स्त्रियांसाठी केलेले कार्य यांवर प्रकाश टाकला. तसेच कार्यक्रमास उपस्थित असलेले श्री. वी. के. साठे, संचालक (वित्त) व श्री. सुगत गमरे, मुख्य महाव्यवस्थापक, (मासं) यांनी ही मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्रीमती भारती कांबळे, उपव्यवस्थापक (मांस) यांनी केले.

## अउदा प्रकल्प नि.संवसु पनवेल परिमंडळामध्ये श्री. सुरज वाघमारे, कार्यकारी संचालक (मानव संसाधन) यांची भेट



मा. श्री. सुरज वाघमारे, कार्यकारी संचालक (मानव संसाधन) यांनी दिनांक. २१.०१.२०१७ रोजी वाशी परिमंडळातील पनवेल मंडळा अंतर्गत पनवेल विभागातील १०० के. व्ही. थळ उपकेंद्र येथे कार्यालयीन भेट दिली.. त्यांच्या समवेत पनवेल विभागातील अतिरिक्त कार्यकारी अभियंता, श्री. एस.एन. म्हसकर व थळ उपकेंद्राचे उपकेंद्र प्रमुख श्री. सुरेशगीर रमणगीर गोसावा, उप.कार्यकारी अभियंता हे हजर होते. श्री. सुरज वाघमारे, कार्यकारी संचालक (मानव संसाधन) यांनी संपूर्ण उपकेंद्राची पाहणी केली. तसेच उपकेंद्रातील सर्व कर्मचाऱ्यांशी चर्चा केली व अडीअडचणी समजून घेतला

## अउदा प्रकल्प नि.संवसु नागपुर परिमंडळामध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

२६ जानेवारी २०१७ अउदा प्रकल्प नि. संवसु परिमंडळ, नागपुर कार्यालयामध्ये मुख्य अभियंता, श्री. एम.एन. बहादुरे यांचे ध्वजारोहण करण्यात येवून प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. ध्वाजारोहण कार्यक्रमास अधिक्षक अभियंते श्री. अणे, श्री. देव, श्री. निबांळकर, श्री. भगत, तसेच परिमंडळाअंतर्गत नागपुर कार्यालयातील कार्यकारी अभियंता, अतिरिक्त कार्यकारी अभियंता, उपकार्यकारी अभियंता, सहाय्यक अभियंता तसेच सहाय्यक महाव्यवस्थापक (मांस) / (विवले), वरिष्ठ व्यवस्थापक (मांस) / (विवले), व्यवस्थापक (मांस) / (विवले), तसेच इतर सर्व कर्मचारी मोठ्या संख्येनी उपस्थित होते. तसेच दरवर्षी प्रमाणे माध्यमिक शालान्त परिक्षेमध्ये गुणवंत प्राप्त कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना शिष्यवृत्तीचा धनादेश वाटप करण्यात आले.



श्री. राजीव कुमार मित्तल, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महापारेषण यांनी विज तांत्रिक कामगार संघटनेच्या अधिवेशनात दिनांक ०२.०२.१७ रोजी सदिक्षा भेट देऊन त्यांस शुभेच्छा दिल्या.

## मा. मुख्यमंत्री यांची (Social Media) वरून महापारेषणच्या कार्याची दखल



महापारेषणचा केलेला उल्लेख खालील प्रमाणे - "महाराष्ट्रात उत्तम दर्जाची आणि अखंडित वीज पुरविण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून वीज कंपनीने एक मोठा आणि महत्वाचा टप्पा गाठला आहे. अमरावती जिल्ह्यातील धारणी येथे १३२ केव्हीचे ईएचव्ही उपकेंद्र आणि त्याला संलग्न वीजवितरणाच्या लाईन्स कार्यान्वित झाल्या आहेत. त्यामुळे १५२ गांवातील सुमारे १२ हजार गावकऱ्यांना त्याचा लाभ मिळणार आहे. ही स्वप्नपूर्ती करणाऱ्या चमूतील प्रत्येकाचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो. हे उपकेंद्र आणि यासाठी लागणाऱ्या वीजवहन लाईन्स या महाराष्ट्र आणि मध्येप्रदेश दरम्यान असून, त्या दाट जंगल असलेल्या मेळघाटमधून गेल्या आहेत. पुरेशा दाबाने आता या गावकऱ्यांना वीज मिळू शकणार आहे. त्यामुळे खूप काळ वीज नसण्यापासून मुक्तता होणार आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे पुरेसे पाणी उपलब्ध असतानाही वीजे अभावी शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ घेता येत नव्हता. पण, आता शेतकऱ्यांना सुध्दा याचा लाभ मिळेल. या प्रकल्पावर राज्य सरकारने पूर्ण क्षमतेने २०१६ पासून लक्ष केंद्रीत केले होते. जे काम स्वातंत्र्यापासूनच्या ७० वर्षात होऊ शकले नाही, ते काम पूर्ण झाले आहे."

"A major milestone achieved by transmission dept towards the goal of reliable and quality supply of power in Maharashtra. With establishment of 132 KV EHV substation & associated source transmission line @ Dharni, Now 12000 villagers from 152 villages to get uninterrupted power. I congratulate entire team for their efforts in making this dream come true. This EHV substation and interstate lines between Madhya Pradesh & Maharashtra which pass through remote and hilly inaccessible terrain of 'Melghat' area will cater 33 KV distribution sub-stations at Dharni, Dabka etc. With proper voltage & uninterrupted power supply, these villages will be free from long darkness spans and farmers will now be able to avail irrigation benefits with ample water availability. The State Govt put special emphasis on this project in 2016 and made all round efforts to electrify this poorly electrified patch, a task not completed despite 70 years of independence."

## अमरावती मंडळाची कार्यपुर्ती

अउदा प्रकल्प नि संवसु परिमंडळ अमरावती १३२ के व्ही आर्णी उपकेंद्र २ २५ एमव्हीए, १३२/३३ के व्ही दि. ०३.११.२०१६ रपजी कार्यान्वीत करण्यात आले. त्यासाठी १३२ के व्ही विद्युत वाहीनी घाटिडी - दिग्रस विद्युत वाहीनीला लीलो – ३२ कि. मी. करण्यात येऊन आर्णी तालुक्यातील गावांना योग्य दाबाने विज पूरवठा होण्यास मदत झाली. १३२ के व्ही यवतमाळ एमआयडीसी उपकेंद्र (लोहारा) २ २५ एमव्हीए, १३२/३३ केव्ही व त्या करिता लागणारी यवतमाळ-यवतमाळ एमआयडीसी उपकेंद्र विद्युत वाहीनी १२ कि. मी. ची दिनांक २८.१२.२०१६ ला यशस्वी चाचणी घेण्यात आली. या उपकेंद्रा करिता लागणारी १३२ के व्ही यवतमाळ-यवतमाळ एमआयडीसी उपकेंद्र विद्युत वाहीनी ही शहरालगत जात असल्य कारणाने या वाहिनीच्या आजुबाजूच्या जमिनीच्‌ि प्रचंड किंमत असतांना सुध्द स्थानिक अधिकाऱ्यांनी संबंधीत शेतमालक यांच्याशी सामंजस्य चर्चा करुन ही विद्युत वाहिनी उभारणीचा मार्ग प्रशस्त केला. सदर वाहिनी उभारीत असतांना विविध उच्च दाबाच्या वाहिनीवर शटडाउन देण्या करीता स्थानिक महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांकडुन मोलाचे सहकार्य लाभले. त्याचप्रमाणे सदर वाहिनी वन विभागाच्या जागेतून जात असल्यामुळे कमीत कमी वेळात केंद्रीय वन विभाग कडुन आवश्यक ती परवानगी कोणतीही एजन्सी न नेमता अंतर्गत कारवाईने प्राप्त करुन सदर जागेत ९ मनोऱ्यांची उभारणी व ५ कि मी तार ओढणी करुन सदर उपकेंद्रांची दिनांक २८.१२.२०१६ ला चाचणी घेण्यात आली. सदर उपकेंद्रांमुळे यवतमाळ एमआयडीसी तसेच यवतमाळ तसेच यवतमाळ शहराला योग्य दाबाचे विज पूरवठा होण्यास मदत होईल.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा महापरिनिर्वाण दिन ६ डिसेंबर २०१६ महापारेषण कंपनीत मुख्य कार्यालयामध्ये तसेच इतर कार्यालयात आयोजित करण्यात आला. मुख्य कार्यालयात ह्या दिवशी बुध्द वंदना घेण्यात आली, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन आदरांजली वाहण्यात आली. अनेक मान्यवरांनी महामानवसाच्या योगदाना बद्दलची व त्यांचा तत्वांची माहिती करून दिली.

या प्रसंगी अनेक आधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

# कराड परिमंडळाची कार्यपुर्ती



महाराष्ट्र राज्य विघुत पारेषण कंपनीच्या कराड़ परिमड़ळाचे मुख्य अभियंता श्री यशवंत गजभिये दि. २८.०२.२०१७ रोजी सेवानिवत्त होत आहेत.त्यानी १६.१२.२०१५ रोजी पदोन्नतीवर मुख्य अभियंता म्हणून कराड़ परिमंड़ळाचा कार्यभार स्वीकारला त्यांच्या कार्यकाळामध्ये विविध प्रशंसनीय कामे करण्यात आली. २२०के व्ही. लोणंद एम आय ड़ी सी उपकेद्र,४०० के .व्ही अलकूड़ ग्रहण केंद्र तसेच २२०के व्ही क्षमतेची ५० कि.मी व ४०० के व्ही क्षमतेची २५ कि.मी. विघुत वाहिनीची उभारणी करुन ती कार्यान्वित करण्यात आली तसेच अनेक वर्षापासुन प्रलंबित असलेली रोहीत्र क्षमतेत वाढ़ करण्यात काचे युध्द पातळीवर करण्यात येवून एकून १५५० एम.व्ही.ए.क्षमता नव्याने वाढ़विण्यात आली. २२० के.व्ही.बिद्री उपकेद्र ग्रीड़ मध्ये जोड़ण्यासाठी विविध अड़चणीवर मात करुन त्यासाठी लागणारी लीलो लाईन मार्च २०१६ मध्ये कमिशन करण्यात आली व सदर उपकेंद्र गीड़मध्ये जोड़ले.तसेच १३२ के.व्ही चंबुखड़ा–बांबवड़े (२५ कि.मी) वचंबुखड़ी-काले (२५ कि.मी) विघुत वाहिनीचे काम करत असताना आर.ओ.ड़ब्लु.च्या अनेक अड़चणी वर मात करत १३२ के.व्ही चंबुखड़ी-बांबवड़े विघुत वाहिनी ०७.०१.२०१७ रोजी कार्यान्वित करण्यात आली व चंबुखड़ी-काले विद्युत वाहिनी फेब्रुवारी २०१७ अखेर कार्यान्वित करण्यात यश येईल.तसेच २२० के.व्ही. कराड़-कोयना विघुत वाहिनीचे प्रलंबित काम असंख्य अड़चणींवर मार करुन पूर्णत्वास आणले असुन सदर वाहिनी फेब्रुवारी २०१७ अखेर कार्यान्वित करण्यात येईल. ४०० के.व्ही विघुत वाहिनीचे इन्सुलेटर्स बदलण्याचे काम युध्दपातळीवर पुर्ण केल्यामुळे गतवर्षीपेक्षा ट्रिपींगचे प्रमाण कमी होवून वाहिनीची उपलब्धता ९९.३८% पासून ९९.८५% पर्यत वाढ़ली. विविध उपकेंद्रातील व विविध वाहिन्याची प्रलंबीत देखभालीची कामे पूर्ण करण्यात आली त्यामुळे रोहीत्र तसेच इतर प्रमुख उपकरणे नादुरुस्तीचे प्रमाण गतवर्ष्रीपेक्षा ५०% ने कमी झाले.तसेच ट्रिपींगचे प्रमाण गतवर्षीपेक्षा सरासरी ४०% कमी झाले. चार वर्षापासुन प्रलंबीत ४०० के.व्ही कराड़-जयगड़ लाईनचे ऑटो रिक्लोजर सर्किटमध्ये घेण्यात आल्याने सदर लाईनची उपलब्धता वाढ़ली. स्थापत्य विभागाकडून देखील विविध प्रलंबीत कामे वेळेत पूर्ण करण्यात येत आहे. मुख्यत्वेकरुन परिमंड़ळ कार्यालयामध्ये अघावत सभागृह बापट कॅम्प कोल्हापुर येथे महिला कर्मचा-यांसाठी विश्रांतीगृह तळंदगे प्रसिक्षण केंद्रामध्ये जिम्नॅशियम हॉल व नविन प्रशिक्षण सभागृह इत्यादी उल्लेखनीय कामे पूर्ण करण्यात आली.तसेच कराड़ परिमंड़ल कार्यालयाजिक वाहन चालकांसाठी विश्रांतीगृहाचे काम पूर्ण केल्यामुळे चतुर्थ क्षेणी कर्नचा-यांची देखील सोय करण्यात आली. तळंदगे प्रशिक्षण केंद्रामध्ये विविध खाजगी संस्थांच्या कर्मचा-यांना प्रशिक्षण देवून महापरिषण कंपनीचे उत्पन्नात ४ लाखांची भर घातली अशा प्रकारचा उपक्रम महाष्ट्रात प्रथमच आयोजित करण्यात आला त्यांच्या सततच्या पाठपुराव्यामुळे प्रलंबीत २५२ योजनांपैकी १७३ योजना पूर्ण करुन त्यांचे कॅपिटलायझेशन करण्यात आले.

उपलब्ध मनुष्यबळाचा पूर्ण क्षमतेने वापर करुन त्यांना प्रोत्साहन देऊन कमीत कमी कालावधीमध्ये सदर कामे पूर्ण केली गेली.

## महापारेषण कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती/निवृत्ती माहे डिसेंबर / जानेवारी -२०१७

**नियुक्ती:-**

| अ.क्र. | नाव | पद | पद स्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. आर.एल. गायकवाड | मुख्य अभियंता (पारेषण) | Projects, DCM, मुख्य कार्यालय, मुंबई | ०३.१२.२०१६ |

**निवृत्ती :-**

| अ.क्र. | नाव | पद | पद स्थापनेचे ठिकाण | दिनांक |
|---|---|---|---|---|
| | निरंक | – | – | – |

# From the Desk of ED (HR)

## प्रशिक्षण

शिक्षण व प्रशिक्षणामधील प्रशिक्षण म्हणजे शिक्षणाच्या पुढील पायरी वरील ज्ञानार्जन की ज्यामध्ये शिक्षणाच्या जोरावर मिळालेल्या अनुभवाचा वापर आपल्या ज्ञानात भर करुन घेणे.

म्हणून प्रशिक्षण व विकास असे नामांकन आपण अनेक वेळा पाहतो. त्यास कारण असे की, प्रत्येक प्रशिक्षणाचा परिणाम विकास असणे होय. त्यामुळे प्रशिक्षणाची निवड, निकड, नियोजन, आयोजन व कृती यांच्या विकासाची सुनिश्चिती होईल अश्या प्रकारे करणे अत्यावश्यक असते. विकासाची सुनिश्चिती झाली नाही तर सर्व परिश्रम तसेच बहुमुल्य वेळेचा अपव्यय होतो.




प्रशिक्षणामुळे अधिक कुशलता येते. सक्षमता वाढीस लागल्याने अधिक आत्मविश्वासाने कामे हाताळु शकतो. कामाच्या गुणवत्तेची नविन पायरी गाठण्यास त्यामुळे मदत होते. त्यामुळे प्रशिक्षणाची गरज सर्वांना असते. Empowerment करण्याचे सर्वात उपयुक्त माध्यम म्हणजे प्रशिक्षण ठरते. It is a core element of Employee Development. ह्याच उद्देशाने आपल्या कंपनीत अनेक अभिनव प्रशिक्षण कार्यक्रम कामाची निकड लक्षात घेवुन आयोजित केले जातात. सातही परिमंडळात कंपनीने "प्रादेशीक प्रशिक्षण केंद्रे" कार्यान्वीत करुन प्रशिक्षण कार्यक्रम वेतनगट ३ व ४ यांच्या करीता प्राध्यान्याने तसेच Entry Level Engineers/Officers करीता Induction Training राबविले जाते. ही सातही प्रशिक्षण केंद्रे CEA यांनी अधिक्रमीत केलेली आहेत. त्यामुळे ह्या केंद्राची गुणवत्ता, धोरण व उपयुक्तता ह्याबद्दल CEA पातळीवर परिक्षण होऊन त्यांची कार्यपातळी राखण्यास मदत होते. कंपनीने ह्या केंद्रामध्ये येणा-या आपल्या स्वत:च्या Faculty Members यांच्यावर सुध्दा Efforts घेऊन त्यांच्या प्रशिक्षण देण्याची कुशलता वाढविण्याकरीता विशेष प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. आज आपल्याकडुन प्रशिक्षण घेण्याकरीता इतर कंपन्या उत्सुक आहेत व त्यांच्याकरीता आपण प्रशिक्षण देत आहोत व पुढेही देणार आहोत की ज्यामुळे Power Sector मध्ये असलेला Skill Gap भरुन काढण्यासाठी आपला हातभार लागेल.

सांघिक पातळीवर आपले स्वतंत्र प्रशिक्षण केंद्र असावे या करीता व्यवस्थापन प्रयत्नशील आहे.

अश्या प्रकारचे प्रशिक्षण आपली सक्षमतेची २५-३०% गरज भागवते. त्यामुळे मोठया प्रमाणात ७०-७५% सक्षमता आपल्या कार्यातुन घडत असते. त्यामुळे काम हेच एक प्रशिक्षण आहे असे त्याकरीता म्हणले जाते. त्याकरीता कामामध्ये स्वत:ला झोकुन देता आले पाहिजे. दिलेले काम मन लावून, रुची घेऊन तसेच त्यामधील ज्ञानाच्या शोधाच्या उद्देशाने घेतली पाहिजे. कामामध्ये एकाग्रता, सुटसटीतपणा, Methodical, मुद्देसुद तसेच स्वच्छ व टापटीपपणा असणे गरजेचे असते. त्याकरीता त्या विषयाच्या मुळात तसेच व्यापकतेमध्ये जाणे गरजेचे असते. विषयाची Deepness आणि Reachness असेल तरच त्या विषयामध्ये आपली निपुणता सिध्द होते. तसे झाले नाही तर आपल्याला त्या विषयाची Superficial Knowledge आहे असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

ज्ञानाची पाठराखण करणाराच ह्या स्पर्धात्मक युगात अग्रेसर ठरु शकतो. त्यामुळे कामरुपी प्रशिक्षणाला गांर्भीयाने घ्या व मिळालेल्या ह्या संधीचे भाग्य समजुन त्याचे सोने करा.

**शुभेच्छां सह !**

**सुरज वाघमारे**
**कार्यकारी संचालक (मासं)**

**संपादक : कु. रेणुका नाटके, जनसंपर्क अधिकारी (महापारेषण)(प्रभारी)**
**E-mail : prohr@mahatransco.in**
**पत्रव्यवहाराचा पत्ता** : संपादक, महापारेषण समाचार, प्रकाशगंगा इमारत, महापारेषण कंपनी मर्यादित, प्लॉट नं. सी. - १९, ई. ब्लॉक, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ (खाजगी वितरणासाठी)

Printed & Published by PRO **For Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.,**
Printed at **Hema Arts :** 121, Sagar, Prabhat Ind., Estate, Near Dahisar Checknaka, W. Exp. Highway, Dahisar (E), Mumbai - 400 068. Ph : 2896 8221
& Published at Prakashganga, Bandra Kurla Complex, Mumbai - 400 051.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.